# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७२६ दिनांक २८/०९/२०२०

## जव्हार पोलीस ठाणे यांचेकडुन विनापरवाना दारु विक्री करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक २६/०९/२०२० रोजी १९.०० वा.चे सुमारास जव्हार पोलीस ठाणे हद्दीतील जांभुळविहीर ता.जव्हार,जि.पालघर येथे दमण बनावटीच्या दारुची विनापरवाना विक्री होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी जव्हार पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी छापा टाकला असता यातील आरोपीत क्र.१ सुनिल बाळु वाघ रा. जांभुळविहीर जव्हार (पु.) ता.जव्हार, जि.पालघर यांनी आपले राहत्या घरात स्वत:चे ताबे कब्जात महाराष्ट्र राज्यात विक्रीस मनाई असलेला एकुण ९,२६०/- रुपये किंमतीचा दमण बनावटीचा विनापरवाना प्रोव्हीशन गुन्ह्याचा माल बाळगला असताना मिळुन आला म्हणुन आरोपीत यांचे विरुद्ध जव्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. III १४८/२०१८ मु.प्रो.व्ही. कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. ए.बी.लेंगरे, प्रभारी अधिकारी जव्हार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली जव्हार पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.